प्र३९

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेची**
**सुधारीत नियमावली तयार करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र. मभूपु २०१२/सुनिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ सप्टेंबर, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
क्र. मभुपु १०९५/१३८७७/प्र. क्र.१०१/सां.का.१, दि. १९ऑगस्ट, १९९५
२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
क्र. मभुपु १०९८/प्र. क्र.२७१/सां.का.१, दि. २ जुलै, १९९९
३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
क्र. मभुपु २००२/प्र.क्र. १३८/सां.का.१, दि. २३ एप्रिल, २००३

**प्रस्तावना :-** देशात उत्कृष्ट कामगिरी करणा-या व्यक्तीस ज्याप्रमाणे पद्मपुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात एखादया क्षेत्रामध्ये उच्चतम कामगिरी करणा-या व्यक्तीचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याची योजना सन १९९५ या सालापासून सुरु करण्यात आली आहे. या पुरस्कार योजनेतील अटी- शर्तीबाबतची नियमावलीमध्ये कालानुरुप योग्य ते बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** विचारांती महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेचे यापूर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन सदर शासन निर्णयान्वये नवीन अटी-शर्तींबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून त्याबाबतचे परिशिष्ट सोबत जोडण्यात येत आहे.

महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरीक सन्मान असल्यामुळे हा पुरस्कार देताना कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणा-या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तीचा विचार करण्यात येईल.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार असून सर्व क्षेत्रातील व्यक्तींचा या पुरस्कारासाठी विचार होणार असल्यामुळे सर्व क्षेत्रातून या पुरस्कारासाठी शिफारशी मागविणे आवश्यक आहे. त्यामुळे या पुरस्कारासाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी योग्य व्यक्तींची नावे आणि त्यांच्या कार्याची माहिती याबाबतचा अहवाल सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठवावा. तसेच सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या निवड समितीचे संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय हे सदस्य सचिव असल्याने त्यांनी सदर पुरस्कारासाठी सर्व क्षेत्रातील मान्यवर संस्था तसेच त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून शिफारशी प्राप्त करुन त्या समितीपुढे ठेवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी घोषीत केलेल्या दुय्यम अधिका-यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

यासाठी होणारा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, प्रधान लेखाशिर्ष २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०४) (०१) इतर महोत्सव (२२०५ १६०५) ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०९०३११५४०४२७०० आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( गीता रा. कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
५. महाराष्ट्र भूषण पुरस्कार समितीचे सर्व अशासकीय सदस्य (संचालनालयामार्फत पत्राने)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
८. अप्पर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य, मंत्रालय,मुंबई
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य,मुंबई
११. संचालक,पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई
१२. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१३. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई
१४. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
१५. सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई
१६. सचिव, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
१७. सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
१८. निवड नस्ती (सां.का.४)

फ्न - १६५१. १७

## परिशिष्ट "अ"
## महाराष्ट्र भुषण पुरस्कार योजनेचे नियम, अटी व शर्ती

(शासन निर्णय क्र.मभूपु २०१२/सुनिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४, दिनांक : १ सप्टेंबर, २०१२ चे परिशिष्ट)

उद्दिष्ट :- महाराष्ट्र राज्यात कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणा-या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तीस महाराष्ट्र भूषण हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करणे.

**पुरस्कारासाठी पात्रता व निकष :-**

१. संबंधीत व्यक्तीने त्याच्या क्षेत्रात किमान २० वर्षे सातत्याने सेवाभावी वृत्तीने तसेच वैशिष्टपूर्ण/ उल्लेखनीय कार्य केलेले असावे. मात्र संशोधनाद्वारे कोणत्याही क्षेत्रात नवीन शोध लावला असल्यास तसेच क्रिडा क्षेत्रात अव्वल दर्जाचे अनेक पुरस्कार प्राप्त खेळाडूच्या बाबतीत विचार करुन हा नियम शिथिल करण्यात येईल.

२. सदर व्यक्तीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

३. पद्मपुरस्कार प्राप्त मान्यवरांना सदर पुरस्कारासाठी प्राधान्य देण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरुप :-**

१.या पुरस्काराची रक्कम रु. १० लाख इतकी असेल.

२. पुरस्कारर्थीला मानचिन्ह आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येईल.

**निवड समिती :-** पुरस्कारासाठी शासनाने नियुक्त केलेल्या निवड समितीचे सदस्य खालीलप्रमाणे असतील.

| | | |
|---|---|---|
| **शासकिय सदस्य** - | १. मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| | २. मा. उपमुख्यमंत्री | उपाध्यक्ष |
| | ३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| | ४. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| | ५. अप्पर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| | ६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

**अशासकीय सदस्य** - पाच अशासकीय सदस्य हे तीन वर्षासाठी नियुक्त करण्यात येतील व दर तीन वर्षानंतर किंवा समितीची पुनर्रचना होईपर्यत समिती सदस्य म्हणुन कार्यरत राहतील.

सद्य:स्थितीत दि.४ जुलै २०११ च्या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १. श्रीमती. स्नेहलता देशमुख | सदस्य |
| २. श्री. चंदू बोर्डे | सदस्य |
| ३. श्री. कुमार केतकर | सदस्य |
| ४. श्री. रघुनाथ माशेलकर | सदस्य |
| ५. श्री. यु. म. पठाण | सदस्य |

सदर समितीस विविध क्षेत्रातील प्राप्त शिफारशी सादर करण्यात येतील व समिती याबाबत अंतिम निर्णय घेईल.

*-*-*-*-*-*-*-*

सांस्कृतिक कार्य संचालनालय
- 6 JUN 2014
आवक क्रमांक 336
विभाग

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेच्या सुधारीत नियमावलीत नवीन अटीचा समावेश करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र. मभूपु २०१२/सुनिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०१४

वाचा :- या विभागाचा समक्रमांकाचा दि. १ सप्टेंबर, २०१२ चा शासन निर्णय

प्रस्तावना :- "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार असून सर्व क्षेत्रातील उच्चतम कामगिरी करणा-या व्यक्तीचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो. या पुरस्कार योजनेतील पूर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन सुधारीत नियमावली संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या नियमावलीमध्ये नवीन बाबी समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी पुरस्कार्थी निवडण्यासंदर्भात दि. २ डिसेंबर, २०१३ मध्ये झालेल्या पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत पुरस्काराच्या नियमावलीमध्ये काही बाबी नव्याने समाविष्ट करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर शासन निर्णयान्वये पुढील नवीन अटींचा नियमावलीत समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात येणार नाही.

२. या पुरस्कारासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे प्राप्त होणा-या शिफारशींची विभाग स्तरावर छाननी करण्यासाठी छाननी समिती गठीत करण्यात यावी व सदर छाननी समितीने प्राप्त शिफारशींची छाननी करुन त्यामधून मान्यवरांची एक निवडसूची तयार करुन ती निवड समितीपुढे सादर करावी. तसेच छाननीअंती निवड सूचीत समाविष्ट न केलेल्या शिफारशींची एक स्वतंत्र यादी निवड समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावी.

३. त्यास अनुसरून महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी प्राप्त शिफारशींची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे छाननी समिती स्थापन करण्यात येत आहे.

श्री. [illegible]
6/6/14

| | | |
|---|---|---|
| १. | उप सचिव (सां.का.) | अध्यक्ष |
| २. | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य |
| ३. | अवर सचिव, (सां.का. ४) | सदस्य |
| ४. | सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
५. महाराष्ट्र भूषण पुरस्कार समितीचे सर्व अशासकीय सदस्य (संचालनालयामार्फत पत्राने)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
८. अप्पर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य, मंत्रालय,मुंबई
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य,मुंबई
११. संचालक,पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई
१२. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१३. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई
१४. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
१५. सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई
१६. सचिव, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
१७. सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
१८. निवड नस्ती (सां.का.४)

-----------

महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड
समितीची पुनर्रचना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. मभूपु-१२१४(११)/प्र.क्र.२०३/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ७ एप्रिल, २०१५

वाचा : १) या विभागाचा क्र.मभूपु/निसपु-२०११/प्र.क्र.११७/सांका-४, दि.४.७.११ चा शासन निर्णय.
२) या विभागाचा क्र.संकीर्ण ८२१४/प्र.क्र.२००/सां.का.४, दि.१३.२.१५ चा शासन निर्णय.
३) या विभागाचा क्र.मभूपु२०१२/प्र.क्र.१४३/सां.का.४, दि.२७.५.१४ चा शासन निर्णय.

प्रस्तावना :- कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणा-या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तीला महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरीक सन्मान असून हा पुरस्कार सन १९९७ पासून देण्यात येत आहे. सदर पुरस्कारासाठी मान्यवरांची निवड करण्यासाठी पुरस्कार निवड समिती गठीत करण्यात येत असून सद्य:स्थितीत संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना करण्यात आली होती. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार सर्व प्रशासकीय विभागांतर्गतच्या समित्या संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीदेखील बरखास्त करण्यात आली आहे. त्यामुळे नवीन निवड समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- विचारांती या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

अ) शासकीय सदस्य

| | |
|---|---|
| १. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य | उपाध्यक्ष |
| ३. मा. सचिव, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| ४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

ब) अंशासकीय सदस्य

| | |
|---|---|
| १. श्री. वासुदेव कामत | सदस्य |
| २. श्री. राजीव खांडेकर | सदस्य |
| ३. ह. भ. प. सौ. मंगला कांबळे | सदस्य |
| ४. श्री. दिलीप वेंगसरकर | सदस्य |
| ५. श्री. उज्वल निकम | सदस्य |

या समितीची मुदत हा शासन निर्णय निर्गमित केल्यापासून ३ वर्षांच्या कालावधीसाठी किंवा समितीची पुनर्रचना होईपर्यंत एवढया कालावधीसाठी राहील.

संदर्भाधीन क्र. ३ च्या शासन निर्णयाद्वारे गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीने महाराष्ट्र भूषण पुरस्कारांतर्गत प्राप्त शिफारशींची छाननी करुन छाननीअंती पुरस्कारासाठी योग्य मान्यवरांची एक निवड सूची तसेच निवड सुचीत समाविष्ठ होऊ न शकणा-या शिफारशींची एक स्वतंत्र यादी तयार करुन या दोन्हीही याद्या पुरस्कार निवड समितीच्या अवलोकनार्थ सादर कराव्यात.

**प्रवास व बैठक भत्ता** :- समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या क्र. प्रवास १०९८/प्र.क्र.७४/९८/सेवा-५,दि.४/१२/९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवासभत्ता व तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१२/प्र.क्र.१/सेवा-५, दि. २४ मे, २०१२ अन्वये बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. यासाठीचा खर्च हा मागणी क्र.झेडडी-२, मुख्यलेखाशिर्ष २२०५, १०२- कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०४) इतर महोत्सव, (०४)' (०१) इतर महोत्सव, (२२०५ १६०५) ५० इतर खर्च या योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री,सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी
३. सचिव (सां.का) यांचे स्वीय सहाय्यक
४. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक
५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय
६. निवड समितीचे सर्व अशासकीय सदस्य (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)
७. महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. अवर सचिव (अर्थसं) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११. निवड नस्ती, सां.का.४